ePaper

## दोन हॅलीपॅड शेतात आहेत असे एकनाथ शिंदे पहिले शेतकरी : आदित्य



| वर्ष - 7 | अंक - 241 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- अफगाणिस्तानविरुद्ध होणार विक्रम
- श्रेया कुळकर्णीचा 'डिलिव्हरी बॉय
- योगी आदित्यनाथ यांचे महत्त्वाचे निर्णय
- पात्रप्रकरणाचा कौल कोणाच्या बाजूने

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 10 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पालिकेची निवडणूक पुन्हा लांबणीवर

## » मंगळवारी (9 जानेवारी) होणारी सुनावणी 4 मार्च रोजी होणार

**। पिंपरी । महाईन्यूज । ।**

**सर्वोच्च न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात दाखल असलेल्या याचिकांवर मंगळवारी (९ जानेवारी) होणारी सुनावणी ४ मार्च रोजी होणार आहे. मार्च महिन्यात लोकसभेची निवडणूक होणार असल्याने आणि त्यानंतर लगेच विधानसभेसाठी निवडणूक होणार असल्याने महापालिकेच्या निवडणुका आणखी पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे इच्छुकांची निराशा झाली आहे.**





स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल आहे. इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणासंदर्भातही याचिका दाखल आहे. या याचिकांवरील सुनावणी पुढे गेली असल्याने निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी होणारी सुनावणी ४ मार्च रोजी होणार आहे. त्यामुळे महापालिका निवडणूक घेण्याचा मार्ग खडतर झाल्याचे दिसत आहे. शहरात गेल्या पावणेदोन वर्षापासून लोकप्रतिनिधी नाहीत. महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्या हातात महापालिकेचा कारभार आहे. महापालिका निवडणूक त्रिसदस्यीय की चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार यावर निर्णय न्यायालयाच्या निकालानंतरच होणार आहे. महापालिकेची गेली पंचवार्षिक निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये झाली होती. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला प्रथमच बहुमत मिळाले होते. भाजपचे तब्बल ९८ नगरसेवक या निवडणुकीत विजयी झाले होते. आगामी निवडणुकीतही शंभरपेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणण्याचे उद्दिष्ट भाजपने ठेवले आहे. मात्र, राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर आणि प्रभागांची रचना कशी होते, यावर अनेक पक्षप्रवेश आगामी काळात होण्याची शक्यता आहे. त्यातच इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणावरही निवडणुकीतील राजकीय गणिते जुळविली जाणार आहेत. मात्र, सुनावणी लांबणीवर पडल्याने ही प्रक्रियाही थंडावली आहे. लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकीनंतर महापालिका निवडणूक होणार असल्याने इच्छुकांच्या अपेक्षांवरही पाणी पडले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल आहे.

### महापालिकेच्या निवडणुका पुढे ढकलल्या

» इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणासंदर्भातही याचिका दाखल आहे. या याचिकांवरील सुनावणी पुढे गेली असल्याने निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी होणारी सुनावणी ४ मार्च रोजी होणार आहे. त्यामुळे महापालिका निवडणूक घेण्याचा मार्ग खडतर झाल्याचे दिसत आहे. शहरात गेल्या पावणेदोन वर्षापासून लोकप्रतिनिधी नाहीत. महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्या हातात महापालिकेचा कारभार आहे. महापालिका निवडणूक त्रिसदस्यीय की चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार यावर निर्णय न्यायालयाच्या निकालानंतरच होणार आहे.महापालिकेची गेली पंचवार्षिक निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये झाली होती. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला प्रथमच बहुमत मिळाले होते.

# पार्थ पवार यांचे शिरूर लोकसभेमधून रीलॉन्चिंग?

## » गेली दीड-दोन वर्ष पार्थ पवारांच्या रिलॉँचिंगची तयारी सुरु

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**दोन वर्ष पार्थ पवारांच्या रिलॉँचिंगची तयारी सुरु आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेसचा जिल्ह्यातील बालेकिल्ला असलेल्या शिरूर लोकसभा मतदारसंघ अधिक सोपा व सोयीचा असल्याची चर्चा असल्याने त्यांच्यासाठी शिरूर लोकसभेचीही गेले काही महिन्यांपासून चाचपणी सुरू आहे.**

मंगळवारी पार्थ पवार हे हडपसर विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेणार आहेत. त्यामुळे पार्थ पवार यांचे शिरूर लोकसभेमधूनच रीलॉन्चिंग होणार ? असेच चित्र दिसत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांची कधी मावळ तर कधी शिरूर लोकसभेसाठी नावाची चर्चा केली जात आहे. परंतु, मावळच्या पराभवानंतर पार्थ यांच्या राजकारणातल्या एंट्रीसाठी अजित पवारांनी सुकर आणि सुरक्षित मार्ग निवडण्याची



तयारी सुरू केली आहे, असेच चित्र गेले काही दिवस दिसत आहे. दोन आडवड्यापूर्वी शिरूर लोकसभेचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना ओपन चॅलेंज देऊन अजित पवारांनी हडपसर मतदार संघातील जाहीर व खासगी कार्यक्रमांना हजेरी लावण्याचा सपाटा लावला आहे. त्यात आता मंगळवारी ( दि.९) पार्थ अजित पवार हे हडपसर विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या माजी नगरसेविका व नगरसेवक यांची त्यांच्या निवासस्थानी व जनसंपर्क कार्यालयात भेट घेणार आहोत. यावरून पार्थ पवार यांचे शिरूर लोकसभा मतदार संघातूनच रिलॉँचिंगची होणार, असेच चित्र सध्या तरी दिसत असून राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या काही पदाधिकाऱ्यांनी या गोष्टीला दुजोरा दिला आहे.

### महायुतीचा उमेदवार कोण?

» आगामी लोकसभा निवडणुकीत शिरुर मतदारसंघातून खासदार अमोल कोल्हे यांचा पराभव करण्याची गर्जना करत दोन आठवड्यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हडपसर मतदारसंघात मांजरी बुद्रुक येथे हजेरी लावत येथील विकासकामांचा आढावा घेतला. येथे येण्याच्या एक दिवस अगोदर अमोल कोल्हे यांना ओपन चँलेंज दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अजितदादा शिरुर लोकसभा मतदारसंघात धडकल्याने साहजिकच त्यांच्या दौऱ्याची जोरदार चर्चा सुरु झाली होती.त्याचवेळी खासदार डॉ. कोल्हे यांच्या समोर महायुतीचा उमेदवार कोण?

# पुण्यात फक्त 398 अनधिकृत बांधकामे?

## समाविष्ट गावांत 2 हजार 222 अनधिकृत बांधकामे

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शहरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले असताना आणि उपनगरांमध्ये बहुतांश ठिकाणी अनधिकृत बांधकामे असतानाही महापालिकेकडील आकडेवारीनुसार शहरात केवळ ३९८ अनधिकृत बांधकामे असल्याचे स्पष्ट झाले आहे. या बांधकामांमध्ये अनेक सदनिकांचा समावेश असून विशेष म्हणजे २०२२ मध्ये महापालिकेने ६ हजार १७९ बांधकामांना नोटिसा बजाविल्या होत्या.**

त्यापैकी ३ हजार ९१८ बांधकामांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती महापालिकेनेच सर्वसाधारण सभेत दिली होती. मात्र दोन वर्षांत शहरात केवळ ३९८ अनधिकृत बांधकामे असल्याने अनधिकृत बांधकामांची संख्या कमी कशी झाली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, गेल्या काही वर्षांत अनधिकृत बांधकामांवरील कारवाई वेगाने सुरू आहे. त्यानुसार आतापर्यंत १६ लाख चौरस फुटांचे क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामांची संख्या कमी झाली आहे, असा दावा बांधकाम विभागाकडून करण्यात आला आहे. शहरातील अनधिकृत बांधकामांचे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. उपनगरांमध्ये विनापरवाना बांधकामे करण्यात येत आहेत. आंबेगाव बुद्रुक परिसरातील अकरा अनधिकृत इमारतींवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाने कारवाई करत या सर्व इमारती जमीनदोस्त केल्या होत्या. मात्र, या इमारतीला दोन वर्षांपूर्वीच नोटीस बजाविण्यात आली होती. मात्र, कारवाई करण्यास टाळाटाळ झाल्याची बाब पुढे आली होती. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी शहर



अभियंता आणि अतिरिक्त आयुक्त यांची समिती स्थापन केली असून, गेल्या तीन वर्षांतील अनधिकृत बांधकामांना दिलेल्या नोटिसा आणि त्यावर केलेली कारवाई याचा अहवाल मागविला आहे. त्याचा आढावा येत्या आठवड्यात घेण्यात येणार आहे. यासंदर्भात प्रत्येक विभागाकडील अनधिकृत बांधकामांची माहिती घेण्यात आली असता शहरात केवळ ३९८ अनधिकृत बांधकामांवर कारवाई राहिली असल्याचे पुढे आले. ही सर्व बांधकामे शहराच्या जुन्या हद्दीतील असून समाविष्ट गावांतील अनधिकृत बांधकामांचा अद्याप यामध्ये समावेश नाही. तसेच पदपथ किंवा रस्त्यावर उभारण्यात आलेले बेकायदा शेड किंवा अन्य बांधकामांचा यामध्ये समावेश नाही.

बांधकाम विभागाने शहराची सात विभागांत विभागणी केली आहे. बांधकाम विभागाची परवानगी न घेता केलेली बांधकामे तसेच नकाशे मंजूर नसताना केलेली बांधकामे अनधिकृत ठरविली जातात. अतिरिक्त बांधकाम करताना चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय), हस्तांतरण विकास हक्क (टीडीआर)चा वापरही अनधिकृत ठरविला जातो. त्यानुसार महापालिकेने ४९१ बांधकामांना नोटिसा बजाविल्या होत्या. त्यापैकी ९३ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत ३९८ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आलेली नाही. येत्या काही दिवसांत त्यावर कारवाई करण्यात येईल, असा दावाही बांधकाम विभागाकडून करण्यात आला. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील गावे महापालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आली. या गावांमध्ये २ हजार २२२ अनधिकृत बांधकामे असल्याची नोंद आहे. गावे महापालिका हद्दीत आल्यानंतर ४५५ बांधकामे हटविण्यात आल्याचा दावाही करण्यात आला आहे. विशेष म्हणजे महापालिकेच्या बांधकाम विभागाने २०२२ मध्ये शहरातील ६ हजार १७९ अनधिकृत बांधकामे असल्याचा आणि त्यापैकी ३ हजार ९१८ बांधकामांवर कारवाई केल्याचे लेखी उत्तर दिले होते.

### या इमारतीला पूर्वीच नोटीस

» आतापर्यंत १६ लाख चौरस फुटांचे क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामांची संख्या कमी झाली आहे, असा दावा बांधकाम विभागाकडून करण्यात आला आहे. शहरातील अनधिकृत बांधकामांचे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. उपनगरांमध्ये विनापरवाना बांधकामे करण्यात येत आहेत. आंबेगाव बुद्रुक परिसरातील अकरा अनधिकृत इमारतींवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाने कारवाई करत या सर्व इमारती जमीनदोस्त केल्या होत्या. मात्र, या इमारतीला दोन वर्षांपूर्वीच नोटीस बजाविण्यात आली होती.

मात्र अनधिकृत बांधकामांची संख्या दोन वर्षांत झपाट्याने घटल्यामुळे खरच कारवाई झाली की अनधिकृत बांधकामांना अभय देण्यात आले, याची चर्चा सुरू झाली आहे. त्यापैकी ३ हजार ९१८ बांधकामांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती महापालिकेनेच सर्वसाधारण सभेत दिली होती. मात्र दोन वर्षांत शहरात केवळ ३९८ अनधिकृत बांधकामे असल्याने अनधिकृत बांधकामांची संख्या कमी कशी झाली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, गेल्या काही वर्षांत अनधिकृत बांधकामांवरील कारवाई वेगाने सुरू आहे.

# जुन्या पुणे-मुंबई रस्त्यावरील बीआरटीला फाटा

## बीआरटी मार्गाऐवजी पीएमपीसाठी स्वतंत्र मार्गिका करण्याचा निर्णय

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**जुन्या पुणे-मुंबई रस्त्याचे रुंदीकरणावेळी प्रस्तावित बीआरटी मार्गाऐवजी पीएमपीसाठी स्वतंत्र मार्गिका करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. रुंदीकरणामुळे रस्ता ४२ मीटर होणार असून दोन्ही बाजूला अडीच मीटर रुंदीचे पादचारी मार्ग आणि दोन्ही बाजूने तीन मीटरची स्वतंत्र मार्गिका करण्यात येणार आहे.**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराला जोडण्यासाठी जुना मुंबई-पुणे महामार्ग हा महत्त्वाचा रस्ता आहे. पुण्याच्या हद्दीत लष्कराकडून खडकीतील २.१ किलोमीटर लांबीच्या रस्ता आहे. तेथे लष्कराकडून जागा ताब्यात मिळत नसल्याने आठ वर्षापासून अंडी उबवणी केंद्रापासून ते संत तुकाराम महाराज पुलापर्यंत (हॅरिस ब्रीज) रस्त्याचे रुंदीकरणाचे काम रखडले होते. जागा ताब्यात आल्यानंतर रखडलेले जुन्या पुणे-मुंबई महामार्गाचे रुंदीकरणाची प्रक्रिया महापालिका प्रसासनाकडून सुरू करण्यात आली आहे. रुंदीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आल्यानंतर रस्त्याच्या मध्यभागी बीआरटी मार्ग करण्याचे पथ विभागाकडून जाहीर करण्यात आले होते. रस्ता रुंदीकरणाचे आत्तापर्यंत ३० टक्के



काम पूर्ण झाले आहे. डिसेंबर २०२४ पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण केले जाणार आहे. जुन्या मुंबई पुणे महामार्गावर सीओईपी ते निगडी बीआरटी प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील बीआरटी मार्गाचे काम पूर्ण झाले असून, तेथे या सेवेचा वापरही सुरू आहे. मात्र, पुणे महापालिकेच्या हद्दीत जागा ताब्यात नसल्याने बीआरटी सेवा सुरू होऊ शकली नव्हती. रस्ता रुंदीकरणानंतर बीआरटी सेवा सुरू केली जाईल, अशी घोषणा करण्यात आली होती. पण आता हा निर्णय रद्द करून रस्त्याच्या दोन्ही बाजूने बससाठी

### रस्त्याचे रुंदीकरणाचे काम रखडले

» रुंदीकरणामुळे रस्ता ४२ मीटर होणार असून दोन्ही बाजूला अडीच मीटर रुंदीचे पादचारी मार्ग पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराला जोडण्यासाठी जुना मुंबई-पुणे महामार्ग हा महत्त्वाचा रस्ता आहे. पुण्याच्या हद्दीत लष्कराकडून खडकीतील २.१ किलोमीटर लांबीच्या रस्ता आहे. तेथे लष्कराकडून जागा ताब्यात मिळत नसल्याने आठ वर्षापासून अंडी उबवणी केंद्रापासून ते संत तुकाराम महाराज पुलापर्यंत (हॅरिस ब्रीज) रस्त्याचे रुंदीकरणाचे काम रखडले होते.

स्वतंत्र मार्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जुन्या मुंबई पुणे महामार्गावर रस्त्याच्या मध्यभागी बीआरटी मार्गाची रचना न करता रस्त्याच्या दोन्ही बाजूने कडेला स्वतंत्र मार्गिका असणार आहे. मुख्य रस्ता आणि पीएमपीचा रस्ता वेगळा ठेवण्यासाठी छोटा दुभाजकही उभारण्यात येणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांनी सांगितले. जुन्या पुणे-मुंबई रस्त्याचे रुंदीकरणावेळी प्रस्तावित बीआरटी मार्गाऐवजी पीएमपीसाठी स्वतंत्र मार्गिका करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.

# चऱ्होलीतील प्रधानमंत्री आवासच्या लाभार्थ्यांचे 'स्वप्न चावी वाटपला आयुक्तांचा 'ग्रीन सिग्नल'

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा बैठकीत जागेवर तोडगा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सर्वांसाठी घर' या संकल्पनेतून चऱ्होली येथे प्रधानमंत्री आवास योजनेतून उभारलेल्या प्रकल्पातील लाभार्थींना दि.१० जानेवारीपासून चावी वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून असलेली लाभार्थ्यांची प्रतीक्षा आता संपली असून, त्यांचे हक्काच्या घराचे 'स्वप्न साकार' होणार आहे.**



पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थींना चावी वाटप करण्याबाबत आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये महापालिका भवनात बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, माजी नगरसेविका सुवर्णा बुर्डे, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह आयुक्त रामदास तांबे यांच्यासह प्रमुख अधिकारी व लाभार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. ज्या लाभार्थींनी नियमाप्रमाणे १० टक्के अनामत रक्कम भरली आहे. त्यांना तात्काळ घरांचा ताबा देण्यात येणार आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी अनामत रक्कम भरावी, या करिता प्रशासन आवश्यक कार्यवाही करणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने सदनिका हस्तांतरण प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून १ हजार ४४२ लाभार्थींना हक्काचे घर मिळणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांना निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी आमदार लांडगे यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता. सुरूवातीला महापालिका भवनामध्ये संबंधित अधिकाऱ्यांची बैठक झाली होती. त्यानंतर महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि आमदार लांडगे यांनी प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी पाहणी करुन काम पूर्ण करण्यासाठी 'कालबद्ध कार्यक्रम' हाती घेतला होता. दरम्यान, भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत चऱ्होली प्रकल्पाचे काम पूर्णत्वास आहे. त्यांचे कर्जही मंजूर झाले आहे. अनामत रक्कम लाभार्थींनी भरलेली आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थींना सदनिकांचा ताबा मिळणे अपेक्षीत होते. गोरगरीब नागरिकांच्या हक्काच्या घरांचा ताबा निर्धारित वेळेत मिळावा, असा आग्रह आमदार लांडगे यांनी प्रशासनाकडे धरला होता. वास्तविक, कोविड महामारी आणि महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात सदर प्रकल्पाला 'खो' बसला होता. जून- २०२२ पासून महायुती सरकारच्या काळात आमदार लांडगे यांनी या प्रकल्पासाठी वैयक्तिक लक्ष घालून प्रकल्पाच्या पूर्णत्वाचा दाखला मिळेपर्यंत सातत्यपूर्ण

> पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडमध्ये सुमारे १९ हजार घरे निर्माण केली जात आहेत. सर्वसामान्य आणि आर्थिक दुर्बल घटकांतील प्रत्येक नागरिकाला आपले हक्काचे घर असावे, अशी अपेक्षा असते. चऱ्होली येथील प्रकल्पाचे काम पूर्ण काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे प्रकल्पातील सदनिका वाटपासाठी प्रशासनाकडून विलंब झाला. आता संबंधित लाभार्थ्यांचे स्वप्न पूर्ण होत आहे. नियोजित प्रक्रियेनुसार लाभार्थींना चावी वाटपासाठी प्रशासनाने तयारी केली आहे. त्यानुसार चावी वाटप करुन तातडीने सदनिकांचा ताबा देण्यात येणार आहे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

पाठपुरावा केला आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थींना चावी वाटप करण्याबाबत आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये महापालिका भवनात बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, माजी नगरसेविका सुवर्णा बुर्डे, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह आयुक्त रामदास तांबे यांच्यासह प्रमुख अधिकारी व लाभार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. ज्या लाभार्थींनी नियमाप्रमाणे १० टक्के अनामत रक्कम भरली आहे. त्यांना तात्काळ घरांचा ताबा देण्यात येणार आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी अनामत रक्कम भरावी, या करिता प्रशासन आवश्यक कार्यवाही करणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने सदनिका हस्तांतरण प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून १ हजार ४४२ लाभार्थींना हक्काचे घर मिळणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांना निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी आमदार लांडगे यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता. सुरूवातीला महापालिका भवनामध्ये संबंधित अधिकाऱ्यांची बैठक झाली होती. त्यानंतर महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि आमदार लांडगे यांनी प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी पाहणी करुन काम पूर्ण करण्यासाठी 'कालबद्ध कार्यक्रम' हाती घेतला होता. दरम्यान, भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत चऱ्होली प्रकल्पाचे काम पूर्णत्वास आहे. त्यांचे कर्जही मंजूर झाले आहे.

# उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करा

## मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा; जनसंवाद सभेत नागरिकांची मागणी

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयांत करण्यात येते. सभेचे अध्यक्ष तथा मुख्य समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या मनपा क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांना महापालिकेच्या अनुषंगाने असलेली कामे, अडचणी, तक्रारी, सूचना दिल्या.**

या सर्व बाबींची नोंद घेऊन संबधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेकडून दिल्या गेल्या आहेत. महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयांमध्ये काल पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण ५० तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे १३, ५, ३, ६, ५, ३, ४, आणि ११ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त



आयुक्त उल्हास जगताप, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मनोज सेठिया, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, अजय चारठाणकर यांनी भूषवले. तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, डॉ. अंकुश जाधव, विनोद जळक, राजेश आगळे, सिताराम बहुरे, उमेश ढाकणे उपस्थित होते. काल पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. यामध्ये उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी आणि मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशा सूचनांचा समावेश होता. तसेच पाणीपुरवठा पुरेशा दाबाने करावा, रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम वेगाने करावे, शहर परिसरात वेळोवेळी किटकफवारणी करण्यात यावी, बसथाब्यांचे नुतनीकरण करण्यात यावे, खराब झालेल्या ड्रेनेज लाईन्स दुरूस्त करण्यात याव्यात या तक्रारी नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. या सर्व बाबींची नोंद घेऊन संबधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेकडून दिल्या गेल्या आहेत. महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयांमध्ये काल पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण ५० तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे १३, ५, ३, ६, ५, ३, ४, आणि ११ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या काल पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. यामध्ये उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी आणि मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.




**कोट्यवधी भारतीयांच्या श्रद्धेचा विषय असलेल्या राम मंदिराच्या कार्यक्रमाला राजकारणाचे जोडे बाहेर काढून उपस्थित राहू, अशी राजकीय परिपक्वता विरोधकांनी दाखविणे अपेक्षित होते, पण परिपक्वतेचा लवलेशही त्यांच्या ठायी नाही. भारतीय संस्कृतीशी आपल्याला देणे-घेणे नसल्याचे त्यांनी सिद्ध केले आहे. हा कार्यक्रम भाजप आणि संघाचा आहे असे जाणूनबुजून दाखवून देण्याचा प्रयत्न होत आहे..**

# प्राणप्रतिष्ठेपूर्वी मुक्ताफळांचे लंगर



अयोध्येच्या भूमीवर मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्राचे मंदिर पुन्हा स्थापित व्हावे, यासाठी ५०० वर्षांहून अधिक काळ सुरू असलेल्या संघर्षांची समाप्ती ५ ऑगस्ट २०२० रोजी झाली. या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते श्रीराम मंदिराच्या भूमिपूजनाचा सोहळा पार पडला. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येतील भव्य मंदिरात प्रभू रामचंद्राच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा होणार आहे. अयोध्येतील हे मंदिर भारताच्या वैभवशाली संस्कृतीचे, भारतीयांच्या अस्मितेचे, श्रद्धेचे, राष्ट्रीयत्वाचे, कोटय़वधी नागरिकांच्या सामूहिक लढय़ाचे प्रतीक असणार आहे. राम मंदिरासाठीचा लढा हा भारतीयांच्या 'स्वत्वा'साठीचा लढा होता. मुघल आक्रमकांनी भारतीयांच्या श्रद्धास्थानांचा हेतूपूर्वक विध्वंस केला. संपूर्ण भारतवर्षाला एका धाग्यात गुंफणारी प्रभू रामचंद्र नावाची संस्कृती उद्ध्वस्त करण्यासाठी मुघल आक्रमकांनी आणि त्यानंतर इंग्रजांनीही जिवापाड प्रयत्न केले. इंग्रजांनी मुघल आक्रमकांप्रमाणे मंदिरे आणि अन्य धार्मिक स्थळांचा विध्वंस केला नाही. मात्र आडमार्गाने भारतीय पुरातन संस्कृती, भारतीय विचारमूल्ये यांच्या खुणा पुसून टाकण्यासाठी आणि भारतीयांना ब्रिटिश मानसिकतेचे गुलाम करण्यासाठी कावेबाज पद्धतीने प्रयत्न केले. प्रभू रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठेद्वारे भारताच्या संस्कृतीचा झेंडा आता जगभर डौलाने फडकणार आहे. हा विषय केवळ धार्मिक नसून राष्ट्रीय अस्मितेचा आहे. विश्व हिंदू परिषदेने मंदिर निर्माण चळवळ सुरू करताना हा लढा कोणा विशिष्ट धर्मीयांविरोधात नसल्याचे वारंवार स्पष्ट केले होते. मंदिरे निर्माणाची चळवळ १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९९० च्या दशकाच्या प्रारंभी भरात असताना अनेक राजकीय पक्ष, विचारवंत, साहित्यिक, पत्रकार मंडळी अयोध्येतील ती जागा रामजन्मभूमी असल्याचा पुरावा मागत होते. त्या वेळी केंद्रात आणि अनेक राज्यांत सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाचे नेतृत्व राम मंदिराच्या उभारणीस अनुकूल नव्हते. रामजन्मभूमी आंदोलनाचा प्रभाव उत्तर भारतात जाणवू लागल्यानंतर आणि उत्तर प्रदेशमधील स्थानिक नेतृत्वाचा दबाव वाढल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी शिलान्यास करण्यास परवानगी दिली. काँग्रेस-कम्युनिस्ट विचारधारेतील मंडळींनी राम मंदिर उभारणीस नि:संदिग्ध पाठिंबा कधीच दिला नव्हता. १९९० आणि १९९२ च्या कारसेवेला मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादानंतर आणि अनेक कारसेवकांनी हौतात्म्य पत्करल्यानंतर विरोधकांची भाषा किंचित मवाळ झाली. मात्र या प्रश्नाची न्यायालयातील खटल्याद्वारे कायमची तड लागावी, यासाठी काँग्रेस नेतृत्वाने कधीच निर्णायक भूमिका घेण्याची धमक दाखवली नाही. २००४ ते २०१४ अशी सलग १० वर्षे देशाची सत्ता उपभोगताना सर्वोच्च न्यायालयातील अयोध्या प्रकरणाची सुनावणी वेगाने व्हावी आणि निकाल लवकरात लवकर लागावा, यासाठी मनमोहन सिंग सरकारला कायदेशीर मार्गाने कार्यवाही करता येणे शक्य होते. तरीही अशी कार्यवाही करणे टाळले गेले. याचे मुख्य कारण मनमोहन सिंग सरकारला आणि या सरकारला पाठिंबा देणाऱ्या सर्व भाजपविरोधकांना प्रभू रामचंद्राचे मंदिर उभे राहावे असे मनापासून कधीच वाटले नव्हते. बहुसंख्याक हिंदूंच्या भावना आणि श्रद्धेची नोंद न घेण्याचे धाडस मनमोहन सिंग सरकारने, कम्युनिस्टांनी, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने, मुलायम सिंह, लालूप्रसाद यांसारख्या समाजवादी विचारधारेतील मंडळींनी दाखवले. याचे मुख्य कारण त्या वेळच्या राज्यकर्त्यांकडे आपल्या देशाच्या संस्कृतीविषयी नसलेली आत्मीयता. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार केंद्रात सत्तेवर आल्यानंतर राम मंदिरप्रश्नी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या सर्व खटल्यांची सुनावणी जलद गतीने होण्यासाठी कायदेशीर मार्गाने प्रयत्न केले.

## संपादकीय »

# कर्तव्य!

***बिल्किस बानो प्रकरणात आजच्या निकालाबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानणे हे किमान कर्तव्य पार पाडल्यास त्याने काही विशेष कामगिरी केली असे समजून डोक्यावर घेण्यासारखे ठरेल.***

बिल्किस बानो प्रकरणात आजच्या निकालाबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानणे हे किमान कर्तव्य पार पाडल्यास त्याने काही विशेष कामगिरी केली असे समजून डोक्यावर घेण्यासारखे ठरेल. हा निकाल काही अवघ्या २१ वर्षांच्या आणि पाच महिन्यांच्या गरोदर बिल्किसवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या, तिच्या डोळय़ादेखत तिच्या तीन वर्षांच्या मुलीस आपटून मारणाऱ्यांच्या विरोधातील नाही. हा निकाल या मारेकऱ्यांच्या मुक्ततेनंतर त्यांचा सत्कार करावा असे वाटणाऱ्यांच्या मानसिकतेविरोधातील आहे. हा निकाल ही महिला 'बिल्किस बानो' आहे म्हणून तिच्यावरील अत्याचारांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांविरोधातील आहे. हा निकाल तिच्यावर अत्याचार करणाऱ्यांस मुक्त केल्याने काही बिघडत नाही, असे मानणाऱ्यांविरोधात आहे.

**या वर्षी पाऊस कमी बरसला. अनेक तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित झाला आहे, धरणामध्ये पुरेसा साठाही नाही. अशा परिस्थिमध्येसुद्धा या वर्षी अनेक शेतमालाला विशेषत: भाजीपाला पिकांना मातीमोल भाव मिळत आहेत. मागील तीन महिन्यांपासून टोमॅटो, पालेभाज्या यांना भाव नसल्याने काही भागांत तो रस्त्यावर फेकण्याची वेळ आली.**

# शेतीचे नुकसान मोजाल, पण मातीचे?

अशा परिस्थितीत सरकारने हस्तक्षेप करावा ही मागणी असते आणि सरकारही तो हस्तक्षेप नेहमीच करत असते. मात्र असा हस्तक्षेप जास्त वेळा ग्राहकहित जोपासण्यासाठी होत असतो. बाजारभाव वाढले की निर्यात बंदी, आयात करून स्वस्तात पुरवठा करणे, त्याचे क्षेत्र वाढावे (तुरी पेरा म्हणून खुद्द पंतप्रधानांनी सांगितले होते) म्हणून प्रोत्साहनपर अनेक योजनांची घोषणा, इ. बाजारभाव फारच कमी झाले, आंदोलने तीव्र झाली की निवडक पिकांना अनुदानाची घोषणा. मागील वर्षी महाराष्ट्र सरकारने कांद्याचे भाव पडले म्हणून प्रति क्विंटल साडेतीनशे रुपये अनुदान दिले होते. या पार्श्वभूमीवर नैसर्गिक संसाधनांवरील ताण हा विषय चर्चेलासुद्धा येत नाही. बाजारभाव पडले म्हणून शेतकऱ्यांनी टोमॅटो रस्त्यावर फेकले. त्यांचा तोटा झाला. अशी चर्चा होते परंतु ते टोमॅटो फेकणे म्हणजे किती लिटर पाणी फेकले, मातीतील किती घटकांची नासाडी झाली, किती सूक्ष्म जीवांची मेहनत



वाया गेली या सर्वांचा विचार नव्हे तर साधी चर्चासुद्धा होत नाही. आज अशी चर्चा करणेसुद्धा हस्यास्पद ठरण्याची शक्यता जास्त. असा विचार सध्या तरी शेतकरी करू शकणार नाहीत कारण त्याची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे पाणी बचत, मातीचे शाश्वत व्यवस्थापन हा विषय त्याच्या अजेंडय़ावर असणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे. मात्र नेहमीच हस्तक्षेप करणाऱ्या सरकारच्या अजेंडय़ावर तरी हा विषय असलाच पाहिजे. या संदर्भात सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील सिना नदीच्या काठच्या शेतकऱ्यांचे अनुभव नोंदविण्यासारखे आहेत. त्या भागातील जमीन अतिशय काळी आणि खूप खोलीची अशी. उत्तरा आणि हस्त नक्षत्रांत दोन-चार चांगले पाऊस झाले की ज्वारी, हरभरा, करडई ही पारंपरिक पिके हमखास चांगली येणार. २००२ मध्ये पाणी आले आणि जवळपास ८० टक्के क्षेत्र ऊस या एकाच पिकाखाली आले. सततच्या उसामुळे जमिनी खराब झाल्या. त्यामुळे उसाची उत्पादकता एकरी ७०-८० टनांवरून पार २५-३० टनांपर्यंत घटली. आता ऊस चांगला येत नाही असे शेतकऱ्यांनी संगितले, त्याची कारणेसुद्धा शेतकऱ्यांनी सांगितली. हे सर्व उपाय शेतकऱ्यांनीच सांगितले. सर्व माहीत आहे तरी हे उपाय का केले नाहीत? असे विचारल्यानंतर त्यांनी जे उत्तर दिले त्याचा आशय पुढीलप्रमाणे- ऊस कुठे विकायचा असा प्रश्न नाही. बाजारभाव कोसळले म्हणून तो रस्त्यावर फेकावा लागत नाही. लगेचच तोटा होण्याची शक्यता तुलनेने कमी, उसासाठी म्हणून खास पाण्याच्या पाळय़ा सोडण्यासाठी सरकार तत्पर असते. लावणी, तोडणी, विक्री यासाठी कारखान्याची यंत्रणा जोडीला असतेच. फेरपालट म्हणून इतर पिके घेतली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पात्रप्रकरणाचा कौल कोणाच्या बाजूने ?

## दिरंगाई करण्यात आल्याचा ठाकरे गटाकडून दावा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या दीड वर्षांपासून सुरू असलेल्या सत्तानाट्याबाबत १० जानेवारी रोजी महत्त्वपूर्ण निकाल येण्याची शक्यता आहे. या निकालामुळे या सत्तानाट्यावर पडदा पडणार की सत्तानाट्यात मध्यांतर येणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने दोनदा फटकारल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांच्या निकालाकडे अवघ्या राज्याचं लक्ष आहे.**

२० जून २०२२ रोजी राज्यात अभूतपूर्व राजकीय घटना घडली. राज्यातील महाविकास आघाडी सरकारमधील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेत बंडखोरी झाली. एकनाथ शिंदे यांनी पक्षात बंडखोरी करून काही आमदारांना आपल्या बाजूने वळवून घेतलं. त्यानंतर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला. ठाकरे गटाने एकनाथ शिंदे, भरत गोगावलेंसह १६ आमदारांना अपात्र करण्याची मागणी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्याकडे केली. ठाकरे गटाच्या या मागणीविरोधात शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. तेव्हापासून हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयातून निवडणूक आयोगात, निवडणूक आयोगाकडून पुन्हा सर्वोच्च न्यायालयात आणि मग आता विधानसभा अध्यक्षांकडे वर्ग करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने गेल्या मे महिन्यात विधानसभा अध्यक्षांनी आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय घ्यावा, असा आदेश दिला होता. परंतु, या सुनावणीत दिरंगाई करण्यात आल्याचा दावा ठाकरे गटाकडून केला गेला. सुनावणीला उशिराने सुरुवात होणे आणि अखंडित सुनावणी न होणे यावरून ठाकरे गटाने पुन्हा सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यामुळे न्यायालयाने मर्यादित कालावधीत सुनावणी पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानंतर, ३१ डिसेंबरपर्यंत सुनावणी पूर्ण करून निकाल देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिले. परंतु, ३१ जानेवारीची डेडलाईन हुकली.



त्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुदत वाढवून देण्याची मागणी केली. यानुसार, दहा दिवसांचा अवधी वाढवून देऊन १० जानेवारी रोजी सुनावणी पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानुसार, बुधवार, १० जानेवारी रोजी निकाल येण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, रविवारी (७ जानेवारी) राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीवरून विरोधकांना टीका केली. आमदार अपात्र प्रकरणाविषयी चर्चा करण्याकरता ही भेट घेतली असल्याचं विरोधकांनी म्हटलं. राहुल नार्वेकर सध्या न्यायाधीशाच्या भूमिकेत आहेत, त्यामुळे त्यांनी याप्रकरणात आरोपी असलेल्या एकनाथ शिंदे यांची भेट घेणं बेकायदा असल्याची प्रतिक्रिया ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिली. ज्येष्ठ वकिल उल्हास बापट यांनीही अशाच शब्दांत टीका केली. तर शरद पवारांसह महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांनीही या भेटीवरून निशाणा साधला. नार्वेकर आणि शिंदे भेटीवरून राजकारण वाढू लागल्यानंतर राहुल नार्वेकर यांना स्पष्टीकरण द्यावं लागलं. ही भेट राज्यातील आणि मतदारसंघातील समस्यांसाठी घेण्यात आल्याचं नार्वेकरांनी स्पष्ट केलं. दोन्ही बाजूच्या पक्षकारांनी आपणच जिंकणार असल्याचा दावा केला आहे. "शिवसेनेशी गद्दारी करणाऱ्या गद्दारांना अपात्र करण्यासंदर्भातील निकाल अद्याप लागायचा आहे. गेल्या ७५ वर्षांपासून हा देश डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानावार चालतोय. या संविधानाला धरून विधानसभा अध्यक्षांनी निकाल दिला, तर ४० गद्दार घरी बसतील, असं आदित्य ठाकरे म्हणाले. तर भरत गोगावले यांनीही शिंदे गटाच्याच बाजूने निकाल लागला असणार असल्याचं म्हटलं आहे,ख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलासा मिळेल, अशी शक्यता वर्तविली जात आहे. विधानसभा अध्यक्षांनी शिंदे गटाच्या बाजूने निकाल दिल्यास सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याची तयारी ठाकरे गटाने सुरू केली आहे. कारण विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयावर न्यायालयीन पुनर्विलोकन करता येते. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी तसे दाखले दिले आहेत. मुख्यमंत्री शिंदे व त्यांचे समर्थक आमदार मात्र निकाल आपल्या बाजूने लागेल याबाबत आशावादी आहेत. शिवसेना विधिमंडळ पक्षात फूट पडलेली नाही. केवळ आम्ही नेतृत्व बदल केला, असा दावा शिंदे गटाच्या आमदारांनी केला आहे. २० जून २०२२ रोजी राज्यात अभूतपूर्व राजकीय घटना घडली.

### नार्वेकर न्यायाधीशाच्या भूमिकेत

» सुनावणीला उशिराने सुरुवात होणे आणि अखंडित सुनावणी न होणे यावरून ठाकरे गटाने पुन्हा सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यामुळे न्यायालयाने मर्यादित कालावधीत सुनावणी पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानंतर, ३१ डिसेंबरपर्यंत सुनावणी पूर्ण करून निकाल देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिले. परंतु, ३१ जानेवारीची डेडलाईन हुकली. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुदत वाढवून देण्याची मागणी केली. यानुसार, दहा दिवसांचा अवधी वाढवून देऊन १० जानेवारी रोजी सुनावणी पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानुसार, बुधवार, १० जानेवारी रोजी निकाल येण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, रविवारी (७ जानेवारी) राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीवरून विरोधकांना टीका केली. आमदार अपात्र प्रकरणाविषयी चर्चा करण्याकरता ही भेट घेतली असल्याचं विरोधकांनी म्हटलं. राहुल नार्वेकर सध्या न्यायाधीशाच्या भूमिकेत आहेत, त्यामुळे त्यांनी याप्रकरणात आरोपी असलेल्या एकनाथ शिंदे यांची भेट घेणं बेकायदा असल्याची प्रतिक्रिया ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिली. ज्येष्ठ वकिल उल्हास बापट यांनीही अशाच शब्दांत टीका केली.

# मनोज जरांगे पाटील यांना व्हायरल फिव्हर

## मनोज जरांगे पाटील यांनारुग्णालयात करण्यात आलं दाखल

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना व्हायरल फिव्हर झाल्याने म्हणजेच त्यांना ताप आल्याने त्यांना गॅलेक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तापामुळे त्यांना अशक्तपणा आला आहे अशी माहिती डॉक्टरांनी दिली. त्याचप्रमाणे त्यांच्या उजव्या पायाला लागलं आहे असंही डॉक्टरांनी सांगितलं.**

मनोज जरांगे पाटील यांना माऊथ अल्सर झाला आहे. तसंच उजव्या पायाला जखम झाली आहे. त्यांच्या सगळ्या चाचण्या केल्या आहेत. तसंच उपचारही सुरु केले आहेत. मनोज जरांगे पाटील यांना व्हायरल फिव्हरही आहे. आता चाचणीचा अहवाल आल्यानंतर पुढचं चित्र स्पष्ट होईल. काळजी करण्यासारखं सध्यातरी काही नाही" असं डॉक्टर विनोद तावरे यांनी म्हटलं आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन उभं केलं आहे. तसंच त्यांनी काहीही झालं तरीही मराठा आरक्षण मिळाल्याशिवाय गप्प बसणार नाही अशीही भूमिका घेतली आहे. मनोज जरांगे पाटील यांचे दौरे आणि मराठा बांधवांशी संवाद सुरु आहे. आज त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना



रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अजित पवारांचं ज्ञान सगळ्या महाराष्ट्राला माहीत आहे. त्यांनी ग्रंथ का लिहिना आम्हाला काय करायचं आहे? मराठा आरक्षणाच्या विरोधात बोलू नका. तुमचं आणि आमचं काही वैर आहे का? मराठा आरक्षणाच्या विरोधात बोलल्यावर मी कुणालाच सोडत नाही. माझ्या कुटुंबाला सोडत नाही तर तुम्ही कोण लागून गेलात?" असाही प्रश्न मनोज जरांगे पाटील यांनी विचारला आहे. मनोज जरांगे पाटील यांना माऊथ अल्सर झाला आहे. तसंच उजव्या पायाला जखम झाली आहे. त्यांच्या सगळ्या चाचण्या केल्या आहेत. तसंच उपचारही सुरु केले आहेत. मनोज जरांगे पाटील यांना व्हायरल फिव्हरही आहे. आता चाचणीचा अहवाल आल्यानंतर पुढचं चित्र स्पष्ट होईल. काळजी करण्यासारखं सध्यातरी काही नाही" असं डॉक्टर विनोद तावरे यांनी म्हटलं आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन उभं केलं आहे. तसंच त्यांनी काहीही झालं तरीही मराठा आरक्षण मिळाल्याशिवाय गप्प बसणार नाही अशीही भूमिका घेतली आहे. मनोज जरांगे पाटील यांचे दौरे आणि मराठा बांधवांशी संवाद सुरु आहे.

### मनोज जरांगेंची अजित पवारांवर टीका

» आज त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अजित पवारांचं ज्ञान सगळ्या महाराष्ट्राला माहीत आहे. त्यांनी ग्रंथ का लिहिना आम्हाला काय करायचं आहे? मराठा आरक्षणाच्या विरोधात बोलू नका. तुमचं आणि आमचं काही वैर आहे का? मराठा आरक्षणाच्या विरोधात बोलल्यावर मी कुणालाच सोडत नाही. माझ्या कुटुंबाला सोडत नाही तर तुम्ही कोण लागून गेलात?" असाही प्रश्न मनोज जरांगे पाटील यांनी विचारला आहे.

# मालदीवची चीनकडे याचना

## राष्ट्राध्यक्षांनी केली पर्यटक पाठवण्याची मागणी!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मालदीवच्या तीन उपमंत्र्यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल केलेल्या अपमानास्पद टिप्पणीनंतर मालदीवची पर्यटन कोंडी करण्याचे सूर भारतातून उमटू लागले आहेत. मालदीवमध्ये भारतीय पर्यटक मोठ्या प्रमाणात जात असतात. परंतु, भारतीय पर्यटक आणि पर्यटन कंपन्यांनी बुकिंग रद्द केल्याने मालदीवच्या पर्यटन विभागाला मोठा तोटा सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या दरम्यान, मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांनी चीनकडे मोर्चा वळवला आहे. मालदीवमध्ये पर्यटक पाठवण्याची मागणी चीनकडे करण्यात आली आहे.**

मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू हे चीन दौऱ्यावर आहेत. चीनच्या फुजियान प्रांतातील मालदीव बिझनेस फोरममध्ये मोइज्जू बोलत होते. तसंच,चीन हा मालदीवचा सर्वांत जवळचा मित्र असल्याचंही त्यांनी म्हटलं. ते म्हणाले, "चीन हा आपला सर्वात जवळचा मित्र आणि विकास भागीदार आहे." कोविडपूर्वी चीन आमची (मालदीवची) प्रथम क्रमांकाची बाजारपेठ होती. चीनला हे स्थान परत मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत अशी माझी विनंती आहे, असं अधिकृत संकेतस्थळावरील प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. मुइज्जू यांनी चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह (बीआरआय) प्रकल्पाचेही कौतुक केले आणि त्यात सामील होण्याची इच्छा व्यक्त केली. दोन्ही देशांनी हिंदी महासागर बेटावर एकात्मिक पर्यटन क्षेत्र विकसित करण्यासाठी USD ५० दशलक्ष प्रकल्पावर स्वाक्षरी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी काही दिवसांपूर्वी लक्षद्वीप दौऱ्यावर होते. लक्षद्वीपर दौऱ्याचे फोटो प्रसिद्ध झाल्यानंतर मालदीवच्या काही मंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीयांवर टीका केली. एवढंच नव्हे तर भारतीयांवर वर्णद्वेषी टीकाही करण्यात आली. यावरून भारतीय नागरिक, कलाकार आणि खेळाडूंनी



सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांचा संताप व्यक्त केला. तसेच भारतीय नागरिकांकडून मालदीववर बहिष्कार घालण्याचं, पर्यटनासाठी मालदीवला न जाण्याचं आवाहन केलं जात आहे. अशातच अनेक भारतीयांनी त्यांची मालदीववारी रद्द केली आहे. तसेच भारतातल्या काही आंतरराष्ट्रीय ट्रॅव्हल कंपन्यांनीदेखील मालदीवसाठी बुकिंग्स घेणं बंद केलं आहे. तर काही ट्रॅव्हल कंपन्यांनी मालदीवसाठी लोकांनी केलेले बुकिंग्स रद्द केले आहेत. परिणामी, मालदीवच्या पर्यटनाला मोठा फटका बसणार असल्याचं चित्र दिसू लागलं आहे. त्यामुळे मालदीवच्या पर्यटन विभागाने भारताची माफी मागितली आहे. २०२३ मध्ये मालदीवमध्ये भारतामधून २ लाखांहून अधिक पर्यटक गेले होते. त्यानंतर रशिया दुसऱ्या स्थानावर आणि चीन तिसऱ्या क्रमांकावर होता. भारताने बहिष्कार घातल्याने मालदीवचे बुकिंग्स रद्द करण्यात आले आहे. परिणामी भारतीयांचा ओढा कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मालदीवचा पर्यटन व्यवसाय सुरळीत राहण्याकरता मालदीवने आता चीनकडे पर्यटनावाढीची मागणी केली आहे. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्ज यांना हटवण्याकरता अल्पसंख्याक नेता आणि खासदार अली अजीम यांनी मागणी केली. मुइज्जू यांना पदावरून बेदखल करण्याकरता मदत करण्याची विनंती त्यांनी मालदीवच्या नेत्यांना केली आहे. मालदीवच्या परराष्ट्र धोरणात स्थिरता राखण्यासाठी आमचा मालदीवियन डेमॉक्रॅटिक पार्टी पक्ष कटिबद्ध आहे, असं अली अजीम म्हणाले. आम्ही कोणत्याही शेजारी देशाला आमच्या परराष्ट्र धोरणापासून वेगळे होऊ देणार नाही. राष्ट्राध्यक्ष मुइज्जू यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्यास सरकार तयार आहे का, अशी विचारणाही त्यांनी केली. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू हे चीन दौऱ्यावर आहेत. चीनच्या फुजियान प्रांतातील मालदीव बिझनेस फोरममध्ये मोइज्जू बोलत होते. तसंच,चीन हा मालदीवचा सर्वांत जवळचा मित्र असल्याचंही त्यांनी म्हटलं. ते म्हणाले, "चीन हा आपला सर्वात जवळचा मित्र आणि विकास भागीदार आहे." कोविडपूर्वी चीन आमची (मालदीवची) प्रथम क्रमांकाची बाजारपेठ होती. चीनला हे स्थान परत मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत अशी माझी विनंती आहे, असं अधिकृत संकेतस्थळावरील प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

### नेमकं प्रकरण काय?

» बिमालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू हे चीन दौऱ्यावर आहेत. चीनच्या फुजियान प्रांतातील मालदीव बिझनेस फोरममध्ये मोइज्जू बोलत होते. तसंच,चीन हा मालदीवचा सर्वांत जवळचा मित्र असल्याचंही त्यांनी म्हटलं. ते म्हणाले, "चीन हा आपला सर्वात जवळचा मित्र आणि विकास भागीदार आहे." कोविडपूर्वी चीन आमची (मालदीवची) प्रथम क्रमांकाची बाजारपेठ होती. चीनला हे स्थान परत मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत अशी माझी विनंती आहे, असं अधिकृत संकेतस्थळावरील प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. मुइज्जू यांनी चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह (बीआरआय) प्रकल्पाचेही कौतुक केले आणि त्यात सामील होण्याची इच्छा व्यक्त केली.

# योगी आदित्यनाथ यांचे महत्त्वाचे निर्णय

## सात हजार अधिक प्रतिष्ठित व्यक्तींना निमंत्रण

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**२२ जानेवारी रोजी भगवान रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी देशभरातील रामभक्त अयोध्येत दाखल होणार आहेत. तसंच, हजारो अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना आमंत्रण देण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते भगवान रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने उत्तर प्रदेशातील नागरिकांची आणि विशेषतः विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्याकरता योगी आदित्यनाथ यांनी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मंगळवारी राम



मंदिर उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना २२ जानेवारीला सुट्टी जाहीर केली. शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर करण्याबरोबरच उद्घाटन समारंभाच्या दिवशी राज्यभरात मद्यविक्री होणार नसल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आदित्यनाथ यांनी २२ जानेवारी रोजी सर्व सरकारी इमारतींना सजवण्याचे आणि कार्यक्रम साजरा करण्यासाठी फटाक्यांची आतषबाजी करण्याचे आवाहन केले आहे. सोहळ्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी अयोध्येत असलेल्या उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी अयोध्येत स्वच्छतेचे 'कुंभ मॉडेल' राबविण्याचे निर्देश दिले. अभिषेक सोहळ्याच्या तयारीदरम्यान स्वच्छ आणि सुंदर शहर राखण्याचे महत्त्व अधोरेखित करून त्यांनी १४ जानेवारी रोजी अयोध्येत स्वच्छता मोहीम सुरू करण्याची घोषणा केली. मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना असेही सांगितले की, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी विश्रांतीची ठिकाणे अगोदरच ठरवावीत, जेणेकरून समारंभ सुरळीत आणि व्यवस्थित पार पडेल. अयोध्या २२ जानेवारी रोजी मंदिरातील प्राण प्रतिष्ठेसाठी सजली आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह RSS प्रमुख मोहन भागवत, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि इतर विशेष निमंत्रित या महाकार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. सात हजारांहून अधिक लोक मंदिर ट्रस्ट, श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्राच्या निमंत्रित यादीत आहेत. बॉलिवूड सेलिब्रिटी, अयोध्येतील प्रसूती रुग्णालयांमध्ये मोठ्या संख्येनं दाम्पत्यांचे अर्ज येऊ लागले आहेत. ज्या महिलांची प्रसूती तारीख २२ जानेवारीच्या जवळपास आहे, अशा महिलांनी २२ जानेवारीलाच आपल्या बाळाचा जन्म व्हावा, अशी विनंती करणारे अर्ज करायला सुरुवात केली आहे.

# संगीत क्षेत्रातला तारा निखळला!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

संगीत क्षेत्रात विख्यात असलेले उत्साद रशिद खान यांचं आज निधन झालं. वयाच्या ५५ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. संगीत सम्राट अशी ओळख असलेले उस्ताद रशिद खान हे गेल्या काही काळापासून कर्करोगाशी झुंज देत होते. ही झुंज अपयशी ठरली. कोलकाता या ठिकाणी असलेल्या रुग्णालयात त्यांना अतिदक्षता विभागात (ICU) ठेवण्यात आलं होतं.

उस्ताद राशिद खान यांच्या मागे पत्नी, दोन मुलं आणि मुलगी असा परिवार आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी याविषयीची घोषणा केली. कोलकाता येथील खासगी रुग्णालयात उस्ताद रशिद खान यांच्यावर उपचार सुरु होते. आम्ही त्यांना वाचवण्याचे पूर्ण प्रयत्न केले पण त्यांची प्राणज्योत मालवली असं डॉक्टरांनी म्हटलं आहे. आज दुपारी ३.४५ च्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला असंही डॉक्टरांनी सांगितलं आहे.

ममता बॅनर्जी यांनी उस्ताद रशिद खान यांच्या निधनाबाबत शोक व्यक्त केला आहे. उस्ताद रशिद खान यांचं निधन ही देशाची हानी आहे. तसंच संगीतविश्वातही त्यांच्या निधनामुळे पोकळी निर्माण झाली आहे. मला अद्यापही विश्वास बसत नाही की उस्ताद रशिद खान आपल्यात नाहीत. त्यांच्या निधनाचं वृत्त क्लेशदायक आहे असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे. उस्ताद रशिद खान यांच्यावर उस्ताद आमिर खाँ आणि भीमसेन जोशी यांच्या गायकीचा प्रभाव होता.

# कंगणाच्या बिल्किस बानोवरील चित्रपटाला जिओ देत नाहीय परवानगी!

सध्या जगभरात बिल्कीस बानो प्रकरण चर्चेत आहे. बिल्कीस बानो प्रकरणातील दोषीची शिक्षा गुजरात सरकारने रद्द केली, त्यासंदर्भात काल सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत गुजरात सरकारचा निर्णय रद्द केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी मोठा निकाल देत ११ दोषींची सुटका नाकारली आहे. आता एकीकडे या प्रकरणाची चर्चा असताना आता बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौतने बिल्किस बानो प्रकरणावर चित्रपट तयार करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. बिल्किस बानो प्रकरणात सोमवारी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर बिल्किस बानो प्रकरणाला वेगळे वळण मिळाले तर त्यानंतर कंगना रणौतने तिच्या अधिकृत X



अकाऊंटवर या प्रकरणाबाबत ट्विट केले आहे. कंगनाच्या एका चाहत्यानं तिला विचारले की, 'कंगना, तू नेहमी महिलांच्या हक्कांबद्दल बोलतेस. महिलांना त्यांचे हक्क मिळावेत यासाठी काम करते. मला तुला हे विचारायचे आहे की, तुला 'बिल्किस बानो'वर चित्रपट बनवायचा आहे का? स्त्रीवादासाठी नाही, एक स्त्री म्हणून तुला तिची कथा जगासमोर आणायला आवडेल का?' कंगना राणौतने देखील या चाहत्यांच्या ट्विटर उत्तर देताना लिहिले की, 'मला 'बिल्कीस बानो'वर चित्रपट बनवायचा आहे आणि गेल्या तीन वर्षांपासून या चित्रपटाच्या स्क्रिप्टवर काम करत आहे. त्याबाबत मी संशोधन करत आहे. यासाठी मी सर्व ओटीटी प्लॅटफॉर्मशी संपर्क साधला, मात्र प्रत्येकाने कोणत्या ना कोणत्या कारणाने चित्रपटाला नकार दिला.'

## श्रेया कुळकर्णीचा 'डिलिव्हरी बॉय



जळगावच्या अभिनेत्री श्रेया कुळकर्णीने हिंदी व मराठी मालिकांसह मराठी चित्रपटांमध्येही काम केले आहे. ती एक मॉडेल सुद्धा आहे. गेले अनेक दिवस तिच्या नव्या चित्रपटाची अर्थात 'डिलिव्हरी बॉय'ची चर्चा सगळीकडे रंगलेली होती. आता हा चित्रपट पुढील महिन्याच्या ९ तारखेला प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात ती एक आगळीवेगळी भूमिका साकारताना दिसणार आहे. श्रेया कुळकर्णीचा प्रदर्शित होणाऱ्या डिलिव्हरी बॉय या चित्रपटात ती एका आव्हानात्मक महिलेच्या भूमिकेत दिसणार आहे. श्रेयाने ही भूमिका साकारण्यासाठी अथक मेहनत घेतली आहे. शालन असे तिच्या व्यक्तिरेखेचे नाव आहे. ही एका गर्भवती महिलेची भूमिका आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना एका नवीन वैज्ञानिक शस्त्रक्रियेबाबत माहिती देणारा आहे. श्रेयाच्या अभिनयाचा हा एक मोठा टप्पा असून अभिनयाची आवड जोपासायला तिला ती कुटुंबीयांकडून नेहमीच सहकार्य मिळते. आई-वडिलांबरोबरच सासरच्या मंडळींनीही नेहमीच अभिनयासाठी प्रोत्साहन दिले आहे, असे श्रेया सांगते. आई आरती कुलकर्णी आणि वडील राजेंद्र कुलकर्णी यांनी लहानपणापासून तिची ही आवड जोपासली. श्रेया अभिनेत्री असून एक सॉफ्टवेअर इंजिनिअरदेखील आहे. ळगावसारख्या छोट्याशा शहरातून येऊन मुंबईच्या मायानगरीत आपले स्थान बनवायला तिला खूप संघर्ष करावा लागला. "डिलिव्हरी बॉय " हा चित्रपट एका संवेदनशील विषयावर भाष्य करणारा आहे. या चित्रपटात श्रेयाबरोबरच प्रथमेश परब, पृथ्वीक प्रताप आदी कलाकारही काम करीत आहेत. मोहसीन खान या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत.

## सुष्मिताच्या 'आर्या 3 'चा दमदार टीझर आऊट

बॉलिवूड अभिनेत्री सुष्मिता सेन (SUSHMITA SEN) पुन्हा एकदा ओटीटी (OTT) विश्व गाजवण्यासाठी सज्ज आहे. सुष्मिताची 'आर्या 3' (AARYA 3) ही बहुप्रतीक्षित सीरिज लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या सीरिजचा दमदार टीझर समोर आला आहे. आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर सुष्मिता प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. शेरनी येण्याची वेळ आता आली आहे. सुष्मिताच्या 'आर्या' आणि 'आर्या 2' या वेबसीरिजने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता 'आर्या 3'च्या माध्यमातून धमाका करण्यासाठी सुष्मिता सज्ज आहे. 'आर्या 3' ही सीरिज 9 फेब्रुवारी 2024 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हॉटस्टारवर ही सीरिज प्रेक्षकांना पाहता येईल. 2020 मध्ये आलेल्या 'आर्या' या सिनेमाच्या माध्यमातून सुष्मिताने अभिनयक्षेत्रात कमबॅक केलं होतं. तर या सीरिजच्या माध्यमातून अभिनेत्रीने ओटीटी विश्वात पदार्पण केलं होतं. या सीरिजमधील सुष्मिताच्या भूमिकेचं खूप कौतुक झालं. आपल्या मुलांच्या संरक्षणासाठी जगासोबत भांडताना अभिनेत्री दिसून आली होती.

'आर्या 3'च्या टीझरमध्ये सुष्मिता सेन म्हणत आहे,"आखिरी सांस लेनेसे पहले वह आखिरी झटका जरूर मारेगी".

या सीरिजबद्दल बोलताना सुष्मिता म्हणाली,"आर्याचं माझ्या हृदयात एक वेगळं स्थान आहे. या सीरिजचा प्रत्येक भाग हा कमाल आहे. आता या सीरिजमध्ये एक वेगळी आर्या तुम्हाला पाहायला मिळणार आहे. या भूमिकेने मला खूप काही दिलं आहे.



## पापाराझीवर भडकला सैफ अली खान

प्रसिद्ध अभिनेता सैफ अली खान (SAIF ALI KHAN) आणि अभिनेत्री करीना कपूर खान (KAREENA KAPOOR KHAN) हे बॉलिवूडमधील प्रसिद्ध जोडप्यांपैकी एक आहे. दोघेही अनेकदा त्यांच्या मुलांसोबत स्पॉट होतात.पापाराझी अनेकवेळा सैफ आणि करिनाचे फोटो क्लिक करतात. नुकताच सैफ हा करीना आणि त्याचा मुलगा जेह यांच्यासोबत स्पॉट झाला. यावेळी काही पापाराझींनी जेह आणि सैफचे फोटो क्लिक केले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये सैफ हा पापाराझीवर भडकलेला दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये सैफ पापाराझींना फटकारताना दिसत आहे. व्हिडीओमध्ये दिसते की, सैफ हा त्याचा धाकटा मुलगा जेह याचा हात धरून स्टेडियममधून बाहेर येतो. यादरम्यान पापाराझी त्यांचे फोटो काढतात. पण सैफला ही गोष्ट अजिबात आवडत नाही आणि मग तो पापाराझींवर चिडतो. तो म्हणतो, "एक सेकंद भाईसाहेब, आधी लाइट्स बंद करा... इथे मुलं फुटबॉल खेळत आहेत आणि तुम्ही लोक याला फिल्मी इव्हेंट बनवत आहात." सैफ अली खान आणि करीना कपूर हे स्टेडियममध्ये पोहोचले होते जिथे त्यांची दोन मुले तैमूर आणि जेह हे फुटबॉल खेळत होते. काही दिवसांपूर्वी सैफ, करीना, तैमूर आणि जेह हे हॉलिडेला गेले होते. सैफ अली खानचा आदिपुरुष हा चित्रपट गेल्या वर्षी रिलीज झाला.

# अफगाणिस्तानविरुद्ध होणार विक्रम

## कोहली-रोहित शर्मासाठी अखेरची संधी? जाणून घ्या

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेला ११ जानेवारीपासून मोहालीत सुरुवात होणार आहे. या मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली. रोहित शर्मा आणि विराट कोहली या अनुभवी खेळाडूंचे संघात पुनरागमन झाले आहे. रोहित कर्णधार म्हणून संघात परतला आहे. पुनरागमन करणाऱ्या या दोन्ही दिग्गजांना मालिकेत अनेक विक्रम करण्याची संधी आहे. कोहली टी-२०मध्ये १२ हजार धावा पूर्ण करू शकतो. त्याचवेळी रोहित आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांमध्ये चार हजार धावांचा आकडा गाठू शकतो.**



अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत कोहलीने ३५ धावा केल्या तर तो टी-२० सामन्यात १२ हजार धावा पूर्ण करू शकतो. विराटने आतापर्यंत टी-२० फॉरमॅटमध्ये चार संघांचे प्रतिनिधित्व केले आहे. भारतीय संघाव्यतिरिक्त, तो दिल्ली, मुंबई आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळला आहे. कोहलीने २००७ पासून या फॉरमॅटमध्ये ३७४ सामने खेळले आहेत. त्याच्या नावावर ४१.४०च्या सरासरीने ११,९६५ धावा आहेत. विराटने ८ शतके आणि ९१ अर्धशतके केली आहेत. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत कोहलीने ३५ धावा केल्या तर तो वेस्ट इंडिजचा ख्रिस गेल आणि किरॉन पोलार्ड आणि पाकिस्तानचा शोएब मलिक यांच्या क्लबमध्ये सामील होईल. गेलने ४६३ सामन्यांमध्ये सर्वाधिक १४,५६२ धावा केल्या आहेत. मलिकने ५२५ सामन्यात १२,९९३ धावा केल्या आहेत. तर पोलार्डने ६३७ सामन्यात १२,३९० धावा केल्या आहेत. विराटने टी-२० फॉरमॅटमध्ये आतापर्यंत ९९ वेळा ५० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत. सर्वाधिक ५०+ धावा करण्याच्या बाबतीत तो तिसऱ्या स्थानावर आहे. ख्रिस गेलने त्याच्या टी-२० कारकिर्दीत ११० वेळा ५०+ धावा केल्या आहेत. त्याच्यानंतर ऑस्ट्रेलियाचा डेव्हिड वॉर्नर दुसऱ्या स्थानावर आहे. वॉर्नरने १०७ वेळा अशी कामगिरी केली आहे. कोहलीने पुन्हा एकदा ५० धावांचा टप्पा ओलांडला तर तो टी-२०मध्ये ५०+ १०० वेळा धावा करणारा तिसरा खेळाडू होईल. या मालिकेदरम्यान कर्णधार रोहित शर्माला आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये चार हजार धावा पूर्ण करण्याची संधी असेल. त्याने १४८ सामन्यात १३९.२४च्या स्ट्राईक रेटने ३८५३ धावा केल्या आहेत. या काळात हिटमॅनची सरासरी ३१.३२ होती. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत त्याने १४७ धावा केल्या तर तो आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये चार हजार धावा पूर्ण करेल. त्याच्या आधी दोन खेळाडूंनी ही कामगिरी केली आहे. सुझी बेट्सच्या नावावर १५२ सामन्यांमध्ये ४११८ धावा आहेत. तर विराटने ११५ टी-२० सामन्यांमध्ये ४००८ धावा केल्या आहेत. रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, यशस्वी जैस्वाल, विराट कोहली, तिलक वर्मा, रिंकू सिंग, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, रवी बिश्नोई, कुलदीप यादव, अर्शदीप यादव, आवेश खान, मुकेश कुमार. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत कोहलीने ३५ धावा केल्या तर तो टी-२० सामन्यात १२ हजार धावा पूर्ण करू शकतो. विराटने आतापर्यंत टी-२० फॉरमॅटमध्ये चार संघांचे .प्रतिनिधित्व केले आहे. भारतीय संघाव्यतिरिक्त, तो दिल्ली, मुंबई आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळला आहे. कोहलीने २००७ पासून या फॉरमॅटमध्ये ३७४ सामने खेळले आहेत. त्याच्या नावावर ४१.४०च्या सरासरीने ११,९६५ धावा आहेत. विराटने ८ शतके आणि ९१ अर्धशतके केली आहेत. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत कोहलीने ३५ धावा केल्या तर तो वेस्ट इंडिजचा ख्रिस गेल आणि किरॉन पोलार्ड आणि पाकिस्तानचा शोएब मलिक यांच्या क्लबमध्ये सामील होईल.

### रोहित चार हजार धावा पूर्ण करू शकतो

गेलने ४६३ सामन्यांमध्ये सर्वाधिक १४,५६२ धावा केल्या आहेत. मलिकने ५२५ सामन्यात १२,९९३ धावा केल्या आहेत. तर पोलार्डने ६३७ सामन्यात १२,३९० धावा केल्या आहेत. विराटने टी-२० फॉरमॅटमध्ये आतापर्यंत ९९ वेळा ५० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत. सर्वाधिक ५०+ धावा करण्याच्या बाबतीत तो तिसऱ्या स्थानावर आहे. ख्रिस गेलने त्याच्या टी-२० कारकिर्दीत ११० वेळा ५०+ धावा केल्या आहेत. त्याच्यानंतर ऑस्ट्रेलियाचा डेव्हिड वॉर्नर दुसऱ्या स्थानावर आहे. वॉर्नरने १०७ वेळा अशी कामगिरी केली आहे. कोहलीने पुन्हा एकदा ५० धावांचा टप्पा ओलांडला तर तो टी-२०मध्ये ५०+ १०० वेळा धावा करणारा तिसरा खेळाडू होईल. या मालिकेदरम्यान कर्णधार रोहित शर्माला आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये चार हजार धावा पूर्ण करण्याची संधी असेल. त्याने १४८ सामन्यात १३९.२४च्या स्ट्राईक रेटने ३८५३ धावा केल्या आहेत. या काळात हिटमॅनची सरासरी ३१.३२ होती. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत त्याने १४७ धावा केल्या.

# न्यूलँड्सच्या खेळपट्टीबाबत आयसीसीने घेतला मोठा निर्णय

## जागतिक कसोटी चॅम्पियन्सशीपमध्ये भारतीय संघ अव्वल स्थानी

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सोमवारी (८ जानेवारी) दक्षिण आफ्रिका आणि भारत यांच्यात झालेल्या कमी धावसंख्येच्या आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप मालिकेच्या सामन्यानंतर आयसीसीने न्यूलँड्सच्या खेळपट्टीला चांगले रेटिंग दिले नाहीत. भारताने दोन दिवसांत दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत एक इतिहास रचला. नुकताच झालेल्या कसोटी सामन्यातील या खेळपट्टीवर आयसीसीने महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.**



केप टाऊनमधील न्यूलँड्समध्ये फक्त ६४२ चेंडूंचा कसोटी सामना खेळला गेला. मोहम्मद सिराजने पहिल्या डावात १५ धावांत ६ विकेट्स घेतल्याने दक्षिण आफ्रिकेचा डाव ५५ धावांत आटोपला. आयसीसी सामनाधिकारी ख्रिस ब्रॉड यांनी आपला अहवाल आयसीसीच्या मुख्य अधिकारी यांना सादर केला. त्या अहवालात सामना अधिकाऱ्यांनी खेळपट्टीवर चिंता व्यक्त केली गेली आणि मूल्यांकनानंतर, केप टाऊनमधील न्यूलँड्सची खेळपट्टी दर्जेदार नसल्याचे मानले गेले. ब्रॉड म्हणाले, "न्यूलँड्सच्या खेळपट्टीवर फलंदाजी करणे खूप कठीण होते. संपूर्ण सामन्यात चेंडू पटकन बॅटवर येत होता तर कधी धोकादायकपणे बाऊन्स झाला, ज्यामुळे शॉट्स खेळणे कठीण झाले. चेंडू अनेक फलंदाजांच्या ग्लोव्हजला लागला आणि विचित्र उसळीमुळे अनेक खेळाडू दुखापतग्रस्त देखील झाले. कसोटीच्या पहिल्या दिवशी २५ विकेट्स पडल्या, यातून खेळपट्टीचा नेमका अंदाज येतो. भारताने दुसऱ्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा सात गडी राखून पराभव केला. या विजयासह टीम इंडियाने दोन सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत सोडवली. दुसरा सामना जिंकल्यानंतर भारताला जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये मोठा फायदा झाला आहे. या सामन्यापूर्वी गुणतालिकेमध्ये सहाव्या स्थानावर असलेल्या टीम इंडियाने मोठी झेप घेतली आणि थेट अव्वल स्थानी पोहोचले आहे. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेला मोठा फटका बसला असून त्यांनी गुणतालिकेतील अव्वल स्थान गमावले आहे. भारताकडे आता ५४.१६ टक्के गुण आहेत, तर दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेशकडे ५० टक्के गुण आहेत. जाणून घ्या सर्व संघांची स्थिती काय आहे?भारताने आतापर्यंत चार कसोटी सामने खेळले आहेत.

### भारताने बरोबरीत सोडवली मालिका

केप टाऊन कसोटी जिंकून भारताने इतिहास रचला. त्याने येथे प्रथमच कसोटी सामना जिंकला आहे. केप टाऊनमध्ये भारताचा हा सातवा कसोटी सामना होता. भारताने केप टाऊन कसोटी जिंकून मालिकेतही १-१ अशी बरोबरी साधली. दक्षिण आफ्रिकेत कसोटी मालिका ड्रॉ करण्यात भारताला यश मिळण्याची ही दुसरी वेळ आहे.